महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in


क्र.एनओटी-३६१७/सीआर-२४/२०२०/२१ दिनांक- २४ मार्च, २०२२

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:**- दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) मुख्य परीक्षा-२०२० सर्वसाधारण गुणवत्ता यादी व भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या(**Opting Out**) सुविधेबाबत.

**संदर्भ:**- जाहिरात क्रमांक ०१/२०२० दिनांक ०३ जानेवारी,२०२०
व जाहिरात क्रमांक ०६/२०२१ दिनांक ०६ ऑगस्ट, २०२१.

दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) मुख्य परीक्षा-२०२० या परीक्षेची सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. सदर सर्वसाधारण गुणवत्ता यादी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून उमेदवारांच्या अर्जांमधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी प्रमाणपत्रे / कागदपत्रे यांची पडताळणी करताना काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये बदल होऊ शकतो. प्रस्तुत सर्वसाधारण गुणवत्ता यादी मा. न्यायालयात दाखल विविध न्यायिक प्रकरणांमधील न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत परीक्षेच्या भरती प्रक्रीयेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्याकरीता आयोगाच्या http://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' या मेनूमध्ये 'Post Preference / Opting Out' वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंक दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी १५.०० वाजेपासून दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

४. ऑनलाईन पध्दतीखेरीज अन्य कोणत्याही प्रकारे पाठविलेला भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय ग्राहय धरला जाणार नाही. तसेच याबाबत उमेदवारांची कोणतीही बाब/निवेदने/ पत्रव्यवहार तद्नंतर विचारात घेतला जाणार नाहीत.

५. भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) विकल्पाआधारे अंतिम निकाल/शिफारशीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. तसेच भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प निवडणा-या उमेदवारांचा अंतिम निकाल प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही.

६. भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्यास कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

ठिकाण- मुंबई.

उपसचिव, परीक्षोत्तर राजपत्रित परीक्षा
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.